महाराष्ट्र मंडळ डेट्रॉईट

एकमेका सहाय्य करु, अवघे धरु सुपंथ

**“आपले मंडळ”**

## ‖ *Maharashtra Mandal of Detroit* ‖



# संक्रांत

विशेषांक

तिळगूळ घ्या
आणि गोड गोड बोला !



फेब्रुवारी २०२३

Avinash, Hema, Ruchi, Akash and Adarsh Rachmale



# The N. Rachmale Foundation

## Prosperity Through Service

Avinash and Hema Rachmale

SKY Group Inc.

Sky Group Grand, LLC.
Real Estate Group

Lakeshore Healthcare Group LHG

Lakeshore Healthcare Group, Inc.
Nursing Home & Managed Care

LAKESHORE GLOBAL

Lakeshore Global
Infrastructure Contractors

www.therachmalefoundation.org | www.Lgccorp.com

# अनुक्रमणिका


| अनु.क्र. | लेख / कविता - नाव | लेखक / कवी | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १ | अध्यक्षांचे मनोगत | शीतल सोनार | ४ |
| २ | काही जुनं काही नवं ... | ज्योत्स्ना माईणकर दिवाडकर | ७ |
| ३ | Ajoba | आर्या सोनार | ९ |
| ४ | गुळाच्या पोळ्या | अनुराधा फाटक | ११ |
| ५ | रघु आणि रामू | शमा सुखटणकर | १३ |
| ६ | साप-शिडी | संजय मेहेंदळे | १७ |
| ७ | त्याचे पाचूचे हिरवे माहेर | डॉ. वीणा शहा | १९ |
| ८ | लाल भोपळ्याचे सूप | बागेश्री नाईक | २२ |
| ९ | रोप इवले | संजय मेहेंदळे | २४ |
| १० | ‘काळ’ आला होता पण ‘वेळ’ आली नव्हती | अभिजित जोगदेव | २७ |
| ११ | चिकन सागोती | सरोज जावकर | ३४ |
| १२ | पर्दा है ... पर्दा है ... | संजय मेहेंदळे | ३७ |
| १३ | सुनंदा महिदाः एक प्रसन्न व्यक्तिमत्व | ज्योत्स्ना माईणकर दिवाडकर आणि मनीषा डोंगरे | ४३ |


लेखकांना, चित्रकारांना आणि वाचकांना संपूर्ण मतस्वातंत्र्य देण्यात आले आहे. लेखांतून व चित्रांतून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक किंवा आपण सहमत असूच असे नाही, तेंव्हा आपण हा अंक केवळ "मनोरंजनासाठी" आहे अशी अपेक्षा ठेवून वाचावा, ही विनंती!


**संपादक :**
ज्योत्स्ना दिवाडकर,
संजय मेहेंदळे

**मुखपृष्ठ:**
सोहम राहुल पारठे

**रचना व मांडणी :**
अश्विनी राहुल पारठे,
स्नेहा नाफडे - विपट

# अध्यक्षांचे मनोगत



## नमस्कार मंडळी,

“वा, वा! काय गरगरीत लाडू वळलेस ग तिळाचे, वहिनी!”
“आण इकडे, मामी, मी पण मदतीला येतो तुझ्या,...”
लहान दिरांच्या, भाचेमंडळींच्या अश्या कौतुकाने मिसळवून घेण्याच्या युक्त्यांनी भारावून जात, प्रत्येक कामात अधिकाधिक सुबकता आणण्यात मजा यायची! नवीनच लग्न झालेल्या प्रत्येक सुनेला अशी कौतुकाची प्रचंड अपेक्षा असते. त्यात एक प्रकारचे वेगळेच सुख असते.

माझ्या वाट्याला असे सुख भरभरून आले.
महाराष्ट्रातून मिशिगनमध्ये आल्यावर महाराष्ट्र मंडळाच्या कार्यक्रमाला पहिल्यांदा आले तेव्हा आपलीच खान्देश, पुणे, नाशिक, मुंबई, सांगली, कोल्हापूरकडची मंडळी भेटली आणि त्याच सुखाची पुन्हा जाणीव झाली. परक्या ठिकाणी ‘परक्या’ लोकांनी आपलेसे करून घेतले आणि खऱ्या अर्थाने “Home away from home” साता समुद्रापल्याडही सापडले.

माझ्यासारख्या अनेकांना हा अनुभव नक्कीच आला असेल. आपलेसे करून घेणाऱ्यांकडून शिकून, आपणही हाच कित्ता गिरवत इतरांना सामावून घेतलं. पाहता पाहता, मी स्वतःच आपल्या संस्कृतीचा वारसा पुढे नेण्यासाठी सज्ज झाले. आणि आता या वर्षीचे महाराष्ट्र मंडळ ऑफ डेट्रॉईटचे अध्यक्षपद स्विकारताना मला अतिशय आनंद होतो आहे.

आपल्याला आवडलेल्या आणि अजून अपेक्षित असलेल्या सगळ्या गोष्टी अंमलात आणाव्या या हेतूने मी, मानसी, सीमा, आणि MMD लीड टीम (https://www.mmdet.org/home-2023/our-team/) सरसावलो. बघता बघता मित्रमैत्रिणींबरोबरच इतरांनीही मदतीचा हात पुढे केला आणि या वर्षीच्या व्यवस्थापनाला सुरुवात झाली. अनेक नवीन सभासदांनी या वेळी हजेरी लावली आहे. युथ कमिटी देखील वेगळ्याच रूपात कार्यरत होताना दिसणार आहे.

संक्रांतीच्या निमित्ताने महाराष्ट्र दर्शन देण्याचं आम्ही ठरवलंय! त्यासाठी आपल्या २ प्रोग्रॅम मॅनेजर्स, सोनाली मोहिले व शलाका दहाड, या दोघींनी भरपूर मेहेनत घेतली आहे, साथीला मंडळाचे अनेक 'विभागप्रमुख' आहेतच. या सर्वांच्या श्रमातून आकाराला आलेला “ ***ऐका दाजीबा*** “ कार्यक्रम तुम्हाला नक्कीच आवडेल!

विशेष म्हणजे या वर्षीच्या MMD च्या कार्यकारिणीने “सर्वसमावेशकता” म्हणजे “inclusiveness” हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून अनेक हटके कार्यक्रम आखले आहेत. मेम्बरशिप वाढवण्यासाठी केलेल्या प्रयत्नांना यश आले आहेच, आणि आता पुढील आखणीला जोरदार प्रारंभ झाला आहे.

आपण नेहमी ऐकतो की “तोडणे सोपे असते पण जोडणे खूप अवघड”, पण माझी ठाम समजूत आहे की सर्वांना सामावून घेणे खरेच सोपे असते, आणि तसेच जोडणेदेखील! “आपल्याला जशी वागणूक मिळावी, तशीच आपण दुसऱ्यांना देऊ” हा मंत्र आणि “केल्याने होत आहे रे, आधी केलेची पाहिजे” हे वडिलधाऱ्यांनी शिकवलेले गमक आपल्या प्रत्येक सदस्याचे ब्रीदवाक्य असणार आहे.

नवनवीन प्रयोग अंमलात आणण्यासाठी आपली टीम सदैव उत्साहात असेल. लहान मुले, स्वतंत्र महिला-उद्योजक आणि आपल्या अनुभवी पिढीसाठी (senior citizens) अफलातून कार्यक्रम करण्याचे आम्ही ठरवत आहोत. आपल्या मंडळाच्या परंपरेला शोभतील असेच सांस्कृतिक कार्यक्रम यावर्षी आखले जात आहेत. तसेच inclusiveness या उद्दिष्टाखाली आपण मागील वर्षीप्रमाणेच A२MM बरोबर एकत्र येऊन काही उपक्रम करणार आहोत.

नेहमीप्रमाणे मंडळाचे मुख्य उद्दिष्ट इथल्या प्रत्येक मराठी मनाला, महाराष्ट्राशी दुरान्वयानेही संबंध असलेल्या प्रत्येकाला “आपले मंडळ, आपले कुटुंब” वाटावे हेच असेल. ते सहजसाध्य होण्यासाठी आर्थिक बाजू सांभाळण्याचे काम आपले २०२३ चे सभासद आणि अर्थातच देणगीदार यांच्यामुळे होत आहे, त्या सगळ्यांना मनापासून धन्यवाद!

तर मंडळी, चला, आपण सगळे मिळून नवीन वर्ष जोमाने साजरे करूया. नवीन volunteersना प्रोत्साहन म्हणून कौतुकाची थाप नक्की द्या, तसेच आमच्याकडून चूकभूल झाल्यास योग्य सूचना द्या आणि कृपया सांभाळून घ्या!



**नवीन वर्षाच्या आणि संक्रांतीच्या तुम्हा सर्वांना खूप खूप शुभेच्छा!**


**तिळगुळ घ्या, आणि गोड गोड बोला!**

आपली विश्वासू,

**शीतल सोनार**

अध्यक्ष , महाराष्ट्र मंडळ ऑफ डेट्रॉईट

फोन – (248) 835 0952 | ई-मेल – president@mmdet.org



TECH5

Technologies for Inclusion

TECH5 Group is an international technology company, an innovator in the field of biometrics and digital identity management, founded by experts from the biometrics industry. We are focused on developing inclusive biometric and digital ID offerings through the application of AI and Machine Learning technologies.

A combination of sustained investment and single-minded dedication to the development of biometric modalities that capitalize on AI has resulted in TECH5's algorithms being consistently ranked in the top tier of NIST ranking for face, fingerprint, and iris recognition.

TECH5 state-of-the-art highly scalable platforms serve a multitude of business cases and are already deployed in several continents serving more than 400 million identities.

TECH5 target markets include both Government and Private sectors with products powering Civil ID, Digital ID, Public safety, Law enforcement, as well as authentication solutions that deliver identity assurance for various use cases.

Visit us at ***tech5.ai***

## With Best Compliments from

# Rahul Parthe & Tech5

**नवीन वर्षाच्या आणि संक्रांतीच्या तुम्हा सर्वांना खूप खूप शुभेच्छा!**



**तिळगुळ घ्या, आणि गोड गोड बोला!**

# काही जुनं काही नवं ...

“खरं म्हणजे वर्षाचे ३ अंक बस्स झाले!”

“प्रत्येक कार्यक्रमाला एक अंक छापायला हवा मंडळाने!”

“ज्यांना ऑनलाईन वाचायचा असेल त्याने तसा वाचावा पण मला मात्र अंकच काय, वर्तमानपत्रदेखील हातात धरून वाचायला आवडतं.”

“फक्त जाहिराती छापा झालं, बाकीचं मंडळाच्या वेबसाईटवर टाका! तेवढेच पैसे वाचतील."


मराठी माणसाबद्दल म्हणतात, “माणसं दोन, मतं तीन!” हे विधान ‘स्नेहबंध’ला लागू आहेच! आपला बिचारा अंक वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. किंवा झपाट्याने होणाऱ्या बदलाच्या भोवऱ्यात! अंकच नाही तर आपण सगळे संक्रमणावस्थेत आहोत.


संक्रांत विशेषांक आहे तर त्यानिमित्ताने संक्रमणाविषयी थोडंसं...

काळाच्या ओघात काही मागे पडलं, काही वाहून गेलं. त्यातलं काही उलट प्रवाही परत आलं. ही जगरहाटी आहे. 'जुनं' हा शब्दच इथे अयोग्य आहे; काळ हा एक निर्देशांक आहे .. Just a coordinate!  मंडळात नव्या सभासदांचे स्वागत आहेच आणि ते करायला सज्ज असलेल्या जाणत्या आणि अनुभवी मंडळींचेही. किंबहुना त्यांचेच हात धरून तर आपण इथपर्यंत पोहोचलो.  आपण पुढे बघत जातो, तसंच मागेही वळून बघतोच ना? त्याचे पडसाद तुम्हाला या अंकात उमटलेले दिसतील. नव्या पाककृती आहेतच पण वर्षानुवर्षे, पिढ्यांपिढ्या चालत आलेल्या, चविष्ट पदार्थांना देखील इथे मानाचे पान आहे. Not old, but time-honored! मागच्या पिढीचे शिलेदार आपले पाय घट्ट रोवून आहेत, त्यांचे शब्द तुम्हाला इथे वाचायला मिळतील आणि इथे जन्मून, वाढणाऱ्या पिढीचेही.

हे मैत्र पिढ्यांचे 'स्नेहबंध'ला लाभले आहे, ते तुम्हांआम्हांला सर्वांना लाभो!

- ज्योत्स्ना  माईणकर  दिवाडकर





## With Best Compliments from

# Sharayu and Pradeep Kokate

# Ajoba



Who never misses a call!
Who is a hard candy with bubblegum filling,
Who is a stethoscope and the heart that beats with it,
Is a golden trophy and a shiny medal,
Is so far away!
Who chooses the small swing at the front door
instead of the rooms inside that large house,
Can’t sit on that swing anymore.
Who tells me I am his pride,
Is the microphone for me to all the other relatives,
Is a pair of big brown boots and a sturdy chair,
Is a silver magnet and the static from rubbing a balloon against your hair,
Who I used to see and talk to from a tiny box in the corner,
Who I can now only see on that screen.
Is like a broken record, repeating timeless stories,
Who calls me his “mini doctor”,
Is a complete to-do list, a full schedule, and the pen that checks them off
Who is a big and colorful bullhorn,  loud and proud
Was sick from small, bur-like shapes that put the world on lockdown,
Is a door handle now covered in spikes,
Doesn't live in the house with the small swing anymore
Is my dictionary and textbooks
Who laughs at my terrible grammar and love dogs
Who snores louder than a stampede of heavy bison
Is like an ice cream sundae with a hard chocolate shell and cookie dough chunks
Is my favorite person
Who never missed a call

**- Aryaa Sonar**

**Sankrant Vaan with best compliments from Sheetal Sonar & family in memory of loved ones**



**With Best Compliments from**

# Prabhakar Patil



# गुळाच्या पोळ्या







**साहित्य:**

१) गूळ .. ३/४ किलो अंदाजे
२) तीळ.. पॉलिश न केलेले 1 वाटी
३) खसखस.. अर्धी वाटी
४) वेलदोड्याची पूड. एक ते दीड चहाचा चमचा.
५) तेल..2 डाव किंवा पाव वाटी च्या पेक्षा जरा जास्त अंदाजे
६) डाळीचे पीठ ३/४ वाटी

**कृती:**

- खडे राहू नये म्हणून गूळ प्रेशर कूकरमधून पातळ करून घेतला.
- तीळ खमंग भाजून गार झाल्यावर पूड करून त्या गुळात घातली.
- खसखस स्वतंत्र खमंग भाजून गार झाल्यावर पूड करून गुळात घातली.
- डाळीचे पीठ तेलावर खमंग भाजून गार झाल्यावर गुळात घातले.
- त्याचबरोबर वेलदोड्याची पूड पण गुळात घालून सर्व छान एकत्र करून गोळा केला. तरीही तो गार झाल्यावर थोडा कडकच होतो.पोळ्या करताना गुळाच्या पातेल्याला कोमट पाण्यात ठेवावे लागते गूळ मऊ होण्यासाठी!
- मी कणीक जास्त अणि मैदा कमी घेतला आहे. नुसता मैदा किंवा नुसती कणीक घेऊनही पोळ्या लाटता येतात.
- ३ वाट्या ह्या कोरड्या पिठात ३ चहाचे चमचे तेल गरम करून घातले थोडे मीठ घालून कणीक घट्ट भिजवून ठेवली आहे.
- (गूळ अणि कणीक भिजवून तयार असल्यावर पोळ्या करायला वेळ लागत नाही.)
- कणकेचा साधारण लाडवाएवढा गोळा घेऊन त्याचे दोन सारखे गोळे करावे. त्या चपट्या गोल छोट्या चकत्या हातानेच दाबून कराव्या.
- तयार गुळाचा एका गोळ्यापेक्षा मोठा गोळा घेऊन त्याची चपटी चकती कणकेच्या चकतीपेक्षा थोडी मोठी करावी अणि ती दोन कणकेच्या चकत्यांच्या मध्ये ठेवावी. मग कणकेच्या दोन्हीही चकत्यांच्या कडा जरा ओढून घेऊन त्याच वेळी डाव्या हाताच्या मधल्या बोटाने गूळ आत दाबून भरून चकत्या बंद कराव्यात.
- कोरड्या मैद्यावर सर्व बाजूनी सारखी पोळी लाटून मध्यम-मोठ्या आचेवर दोन्हीही बाजूने भाजून घ्यावी. गार झाल्यावर भरून ठेवाव्यात.
- **टीप:** *भारतात गूळ खूप छान अणि खूप प्रतीचा मिळतो. इथे जो मिळेल तोच घ्यावा लागतो. गुळाच्या पोळीला चिक्कीचा गूळ घ्यायचा नाही. तसेच कणीक ही ताजी अणि चांगल्या गव्हाची असते. आपले कोणतेही पदार्थ तिथे जितके छान होतात तितके इथे होतीलच असे नाही हे समजून घ्यावे.*
- वितळवून घेऊनही खडा येऊ शकतो. तो गुळाचा गोळा करून घेतांना आला की काढून ठेवावा.

**सर्वांना मकर संक्रांतीच्या शुभेच्छा.**

**तिळगूळ घ्या अणि गोड बोला.**

- अनुराधा फाटक







State Farm

## TROY

2916 E LONG LAKE RD, TROY, MI 4808

**PH – 248-250-9708**

JAYMUNJ.COM

## ROCHESTER

1461 N ROCHESTER RD, ROCHESTER HILLS, MI 48307

**PH – 248-218-2526**

AGENTJAYMUNJ.COM



# JAY MUNJ STATE FARM.

# रघु आणि रामू

सध्या जपानमध्ये एक सिरीयल खूप गाजते आहे, कां तर ह्यात २-३ वर्ष्यांची लहान मुलं एकटी मैलभर चालून जातात आणि शॉपिंग करतात. आणि आता अमेरिकेत पण अशी सिरीयल चालू करण्याच्या बातम्या कान वर येत आहेत. जपानी सिरीयलची एक छोटीशी चित्रफित पाहायला मिळाली. छोटी छोटी मुलं इतकी गोड़ होती आणि लांब चालत जाऊन शॉपिंग करून आई वडिलांना मदत करीत होती. अगदी कौतुक करण्यासारखीच गोष्ट आहे पण नंतर विचारचक्र सुरु झालं आणि लक्षात आलं कीं आपल्या भारतातली कितीतरी लहान मुलं लोकांकडे कामं करून किंवा शेतात काम करून आपल्या आई वडिलांना आर्थिक मदत करतात किंबहुना त्यांना ते करण भाग असतं. गरिबी माणसाला काय काय करायला लावेल हे सांगता येत नाहीं. गरीब देशात child labor हा समाजाचा एक दुर्दैवी उपक्रम आहे तर श्रीमंत देशात कौतुकाची बाब आहे .

मला एक माझ्या लहानपणीची गोष्ट आठवली. आमच्या शेजारी एक मराठी कुटुंब होते आणि आमचे त्यांचे खूप चांगले संबंध होते. नुकताच त्यांच्याकडे एक मुलगा गावाहून कोणीतरी आणला होता, छोटी कामं करण्यासाठी. असेल तो १२-१३ वर्षाचा. पण रंग एकदम काळा कुळकुळीत, तोंडावर सदा दिलखुलास हसू, टप्पोरे डोळे आणि सर्वांना आवडेल असं व्यक्तिमत्व. घरातली किरकोळ कामं करून संपली की तो गाणी म्हणून, हावभाव करून नाच करायचा आणि सर्वांची करमणूक करायचा. नशिबाने हात दिला असता तर एव्हाना मोठ्ठा सिनेमा नट झाला असता. त्याच नाव होतं रघु. या ना त्या कारणाने रघु आमच्याकडे येत जात असायचा.

एकेदिवशी रघु आमच्याकडे आला, स्वारी खूप खुशीत दिसत होती. तो आम्हाला म्हणाला “ताई, उद्या माझी आय आणि भाव गावसून येतले हा”. माझी आई म्हणाली मग आमच्याकडे घेऊन ये. हो म्हणाला आणि नाचत नाचत निघून गेला. दुसऱ्या दिवशी रघु त्याच्या आईला आणि भावाला घेऊन आमच्या घरी आला. त्याचा भाऊसुद्धा त्याच्यासारखचा दिसायला गोड़ होता. त्याचं नाव रामू. रामूच्या आईने स्वतःच सर्व घराची टेहळणी केली आणि नंतर चहा पाणी घेऊन रघुबरोबर निघून गेली.

दुसया दिवशी रघुची आई, रघु आणि रामू आमच्या घरी आले आणि आई माझ्या आईच्या पायावर डोकं ठेवून रडायला लागली!
म्हणाली कीं रामूला तुमच्याकडे कामाला ठेवा, पगार देऊ नका, फक्त दोन वेळां जेवायला द्या.
माझी आई म्हणाली अगं, किती लहान आहे तो. त्याला काय काम देऊ? शिवाय माझ्याकडे कामाला बाई आहेच.
पण ती ऐकेच ना. एकसारखं पाय धरून विनवण्या करू लागली ‘फक्त दोन वेळा जेवायला द्या’.
शेवटी आई म्हणाली ‘बरं, मी दोन वेळा जेवायला देईन पण मी त्याला कामाला ठेवणार नाहीं’.
तशी ती म्हणते कशी “बाई काम न करता जेवण नको. मग आमच्यात आणि भिकाऱ्यांच्यात फरक काय?”
तिच्या ह्या वाक्यानं आम्ही पण अवाक झालो. त्या अडाणी, गरीब बाईकडे जो स्वाभिमान होता तो किती मौल्यवान होता! आज अमेरिकेत कितीतरी सुदृढ माणसं Welfare वर जगतांना दिसून येतात आणि खंत वाटते.

शेवटी रामूला आम्हीं ठेवून घेतला. त्याच्या हाताचे पंजे इतके छोटे होते की त्या हातांना कुठलंही काम करायला लावणं हे आम्हाला तरी शक्य नव्हतं. तरी रामूच्या आईच्या विनंतीला मान देऊन त्याला काम देण्याचा प्रयत्न केला...
‘हे ह्या शेजाऱ्यांना नेऊन दे, हे त्या शेजाऱ्यांकडून घेऊन ये’ अश्या प्रकारची काम त्याला देऊ लागलो. पण प्रत्येकवेळी रामू त्याच्याबरोबरच्या मुलांशी भांडण करून त्यांच्या कागाळ्या घेऊन येऊ लागला…
“गण्यानं माझ्या नाकार मुटको मारलो”, “शिरप्यान माझे केस ओढल्यानी”.
म्हणजे कामाचं तर सोडूनच द्या, पण आमच्या आईला त्याची भांडण सोडवायला जायचं हा एक उद्योगच लागला. मुलींची लग्न व्हायच्या अगोदरच तिला नातवंड मिळालं होतं.

एके दिवशी रामू अंगणात खेळायला गेला होता आणि कुणाशी काय भांडण झालं माहित नाही, हमसाहमशी रडत आला आणि म्हणाला, मला आत्ता माझ्या आईकडे नेऊन सोडा. सर्वांनी त्याची खूप समजूत घातली पण ऐकेच ना.

अख्खा दिवस रडत होता. शेवटी दुसऱ्या दिवशी रघुने कोणाच्यातरी सोबतीने त्याला आईकडे नेऊन सोडला.  मग रघुकडून त्याची खुशाली मधून मधून समजायची तेवढीच.

दरम्यान माझं लग्न होऊन मी अमेरिकेत आले. रघु-रामूच्या आठवणी आता थोड्या बोथट झाल्या होत्या पण नंतर एका माझ्या मुंबईच्या ट्रीपमध्ये गप्पा मारताना रघु-रामूचा विषय निघाला आणि कळलं कीं रघु ज्यांच्याकडे कामाला होता, त्यांच्या मुलानें रघुला हाताशी घेऊन फॅक्टरी काढली आहे आणि रघुच सगळा कारभार शिताफीनं बघतो.  रघुचा आता रघुशेठ झाला होता. आणि रामू पण त्याच फॅक्टरीत काम करतो. ऐकून खूप आनंद झाला.

आज रघु-रामू सारखी अनेक गरीब मुले लहानपणापासून नोकरीकरून आई वडिलांना घर चालवण्यात मदत करतात आणि नशिबाने साथ दिली तर रंकाचे राव पण होतात. त्यांच्या आयुष्यावर कोणी सिरीयल काढली तर ती नक्कीच गाजेल, अगदी जपानमधल्या आईवडिलांसाठी शॉपिंग करणाऱ्या छोट्या मुलांच्या सिरीयल सारखीच!

आज पुन्हा खूप वर्षानंतर रघु रामूची आठवण झाली. पुढच्या ट्रीपमध्ये काहीतरी update नक्कीच मिळेल, तोपर्यंत रघु रामूला शुभेच्छा!

- शमा सुखटणकर

---




Pillars of Strength and Character.
Premier Provider for Property and Casualty Insurance
HRTG
LISTED
NYSE
HERITAGE®
Insurance
(855) 536-2744
www.heritagepci.com
WITH BEST COMPLIMENTS OF HERITAGE INSURANCE HOLDINGS, INC.
AND VIJAY S. WALVEKAR, ONE OF ITS FOUNDERS AND DIRECTORS.


C4D
MORTGAGE
C4D MORTGAGE COMPANY, LLC
OPENING DOORS — CLOSING LOANS
WHY C4D MORTGAGE COMPANY?
Best in business since 2003 due to our dedication in customer service.
Lowest rates on the market.
5-star rating on Zillow.
Exceptional team of educated, licensed and experienced loan officers.
Refinance, purchase, or cash-out loans.
Zero closing costs.
Call today for a free consultation
(586)421-5092
WWW.C4DMORTGAGE.COM
NMLS #151261

# साप-शिडी


मागची पिढी
पुढची पिढी
करतात माझी
साप-शिडी

.मागची पिढी सांगते
बचत करा, सतत करा
पुढची पिढी सांगते
कर्ज करा, खर्च करा

मागची पिढी म्हणते
सातच्या आत घरात या
पुढची पिढी म्हणते
YOLO म्हणत जगून घ्या

मागची पिढी म्हणते
जपून वापरा, काळजी घ्या
पुढची पिढी म्हणते
एकदा वापरा, टाकून द्या

मी आपला
दोघांचं ऐकतो
शेवटी मला
हवं तेच करतो



- संजय मेहेंदळे


Looking to Buy or Sell Your Home?
Call Priyanka Dabhi today for all your real estate needs—buying, selling, or even just looking for a home.
kw
Priyanka Dabhi
KW Professionals
REALTOR®
(734) 331-5666
priyanka4realestate@gmail.com
www.pdabhi.kw.com


Curriculum Based Kathak
Certified by
Tilak Maharashtra
Vidyapeeth, Pune
ASMI
Dance Academy
For Inquiries Contact
Anagha Huprikar
(Founder of ASMI Dance Academy)
248-701-5275 | asmidanceacademy@gmail.com
Batches at:
Rochester Hills | Troy | Novi | Okemos (Lansing)

# त्याचे पाचूचे हिरवे माहेर

सॅप ग्रीन...

कोबाल्ट ग्रीन....

व्हिरिडीयन ऑलिव्ह ग्रीन....

कॅडमियम ग्रीन.....

एमेराल्ड ग्रीन...

किती, किती हिरव्या रंगछटांचे विभ्रम, आणि तेही कितीतरी सुंदर, अजरामर चित्रांमधून....
डोळ्यांचे पारणे फिटावे असे दमदार, आत्मविश्वासी कुंचल्याचे फटकारे व त्यांच्यामधून जाणवणारी त्याची व्यक्त होण्याची धडपड.

व्हॅन गो या महान चित्रकाराच्या प्रदर्शनातून फिरतांना प्रामुख्याने जाणवतात ते दोन रंग- त्याचा आवडता पिवळा, आणि पानांचा, झाडांचा, शेताचा हिरवा.

हिरव्या रंगातही पाचूचा हिरवा सारखा भेटतो- तैलरंगामध्ये ज्याला 'एमेराल्ड ग्रीन' म्हणतात. चैतन्याने रसरसलेल्या निसर्गचित्रांमधून ही हिरवाई सारखी भेटत राहते आणि विन्सेंटच्या मनातली तगमग, एकाकीपणा, आत्यंतिक वैफल्य लपवत राहते .

येथे पिवळ्यापेक्षा हिरवाच रंग जास्त भेटतो... त्याच्या सर्व सामर्थ्यानिशी, सर्व रंगछटांमधून.

आयरिसच्या निळ्या- जांभळ्या फुलांची तलवारीसारखी बलदंड, निळसर हिरवी, भूमीतून सळसळत वर येणारी पानं, पावसाची सर येऊन गेल्यानंतरची गव्हाची टवटवीत हिरवी पिवळी शेतं, निळ्या टेकड्यांच्या पायथ्याशी वर्षानुवर्षे खंबीरपणे तपस्या करणारी ऑलिव्हची काळपट हिरवी झाडं, पांढऱ्या गुलाबांना उठाव देणारी हिरवी- निळी पार्श्वभूमी,
भर उन्हाळ्यात हिरवाकंच पर्णसंभार मिरवणारी मित्राची बाग, ऑइसे नदीच्या काठची गूढ हिरवी झाडी व नदीचे हिरवे- निळे पाणी, गव्हाच्या गंज्यावरून घरंगळणारा झगमगता पिवळा रंग तोलून धरणारा आजूबाजूच्या शेताचा पोपटी हिरवा रंग, ऑव्हर्स गावातली हिरव्या झाडीचे श्रीमंत कोंदण लाभलेली घरं आणि तिथल्या व्हिन्सेंटनेच प्रसिद्धीला आणलेल्या, लाडिक वळणे घेणाऱ्या पिवळ्या पायऱ्या, हिरव्या रंगाचे किती मनोहारी अविष्कार कॅनव्हासवर उमटले आहेत इथे!!

पण, अचानक कुठेतरी दिसतात त्यानेच चितारलेल्या आत्मप्रतिमा... कितीतरी वेगवेगळ्या काळामधले स्वतःचे असफल जीवन प्रकट करणाऱ्या. त्याच्या निळ्या- हिरव्या डोळ्यांमधून जाणवणारी असंतोषाची, संशयाची आग, भोवतालच्या जागेविषयीचा अविश्वास, प्रेक्षकांच्या मनाचा ठाव घेणारी त्याची थेट, सरळ नजर. ही आत्मचित्रे त्याच्या निसर्गचित्रांच्या अगदी विरुद्ध.

आपल्या फक्त सदतीस वर्षांच्या आयुष्यात अत्यंत अभागी, अयशवी ठरलेला, प्रियजनांनी वारंवार झिडकारलेला हा मनस्वी कलाकार. दारिद्र्याशी सामना करीत, धाकट्या भावाने पाठविलेल्या पैशांमधून तैलरंग, कॅनव्हास, ब्रश विकत घेऊन चित्रनिर्मिती करत राहिला. या स्वप्रतिमांमधून दिसते ते उघडे-नागडे वास्तव. एक स्वतःवर व सर्व जगावर क्रुद्ध असलेला, धगधगत्या ज्वालामुखीसारखा कोणत्याही क्षणी स्फोट होईल असा असंतुष्ट आत्मा.



बऱ्याच निसर्गचित्रांकडे बघून मला कविवर्य मंगेश पाडगावकरांच्या प्रसिद्ध ओळी आठवतात- "पाचूच्या हिरव्या माहेरी
ऊन हळदीचे आले"

माहेर म्हणजे तरी काय? सारे ताणतणाव, घुसमट, सासुरवास, विसरायला लावणारं हक्काचे प्रेमळ घर, कधी कधी पुरुषांनाही हवेसे वाटणारे. ते घर व्हिन्सेन्टला या हिरव्या रंगांमध्येच सापडले असेल का?
"अशावेळी घरापुढच्या झाडांकडे बघत राहातो क्षणभर हिरवेपण पांघरून उरलेले सारे आयुष्य त्यांना देऊन टाकतो"

असह्य वैफल्य, कमालीचा एकाकीपणा आणि घनघोर निराशा विसरून जायला उपायही तसाच जालीम हवा ना? अंतिम शांती म्हणजेच मृत्यू - तो स्वतःच्या हातांनी मिळवायच्या आधी त्याने झपाटल्यासारखी चित्रे रंगवली. आपल्या चित्रांमधून हिरवे मोरपिसारे फुलविले, पाचूच्या लकेरी गुंफल्या. झाडांनी लावलेला हिरवा सूरच त्याच्या दुःखविव्हल, एकाकी हृदयावर थोडीशी फुंकर मारून, शांतवून गेला असेल का? कोणास ठाऊक!

- डॉ. वीणा शहा





Travel mugs, bottle, coffee mugs
CUSTOMIZE YOUR APPAREL
T-Shirt, Hats, Sweatshirts, Golf Shirts, ETC.
-Embroidery
-Screen Printing
-Full-Color Printing
-Vinyl Names & Numbers
SAMI'S ENGRAVING & GIFTS
PERSONALIZED HOLIDAY GIFTS, & MORE...
Plaques
Trophies & Medals
Desk Clock
Full Color Mugs
Cutting & Serving Board
Rosewood Finish Martini Set
3-Piece BBQ Set
Corporate Gifts, Custom Engraving, Promotional Products
Visit us online or in store for more gift options and varieties
samisgifts@gmail.com | (248)-250-4931 • www.samisgifts.com • 4935 Rochester Rd, Troy, MI 48085




SUGUNA'S
Beauty Touch
Scan the code to download app
and book your first appointment

# लाल भोपळ्याचे सूप

ऑक्टोबर महिना सुरू झाला की थंडीची चाहूल लागते आणि सगळीकडे बघावं तिथे भलेमोठे भोपळे दिसायला लागतात. ते पाहिले की मला लहानपणी ऐकलेली म्हातारीची “चल रे भोपळ्या टुणूक टुणूक” गोष्ट आठवते. लहानपणी भोपळा खाल्ला की परीक्षेत भोपळा मिळतो अशी माझी भाबडी समजूत असल्यामुळे त्या भोपळ्याकडे ढुंकूनपण न बघणारी मी आजकाल सर्रास त्याचा वापर करायला लागले आहे. त्याचं कारण एकच, एकदा काय तो वाफवून घेतला की त्याचे पराठे, पुरी, सूप , रायतं असे ४-५ तरी पदार्थ बनवता येतात. आणि मग ‘आज काय करायचं’ हा प्रश्न तात्पुरता सुटतो. ह्या भोपळ्यामधे कधी भारतीय मसाले तर कधी ऑरेगनो, थाईम घालून चव बदलता येते अन् घरातल्या मंडळींना “उल्लु” बनवता येतं!

सूप हा प्रकार मला पहिल्यापासूनच खूप आवडतो. त्यामुळे सुपचे बरेच प्रयोग मी करत असते. त्यातल्या त्यात भोपळ्याचे आणि भेंडीचे सूप सगळयात जास्त आवडीचे. ‘भेंडीचे’ हा शब्द वाचून बरेच जण ‘ई ई’ म्हणत नाक मुरडतील. पण त्याबद्दल नंतर कधीतरी!



**पाककृती:**


**Ingredients:**

- लाल भोपळा वाफवून
- १ छोटा कांदा
- २-३ लसूण पाकळ्या
- ऑरेगनो
- काळी मिरपूड
- मीठ चवीनुसार
- १/४ कप heavy whipping cream

**कृती:**

पातेल्यात थोडं ऑलिव्ह तेल गरम करून त्यात काळी मिरी ३-४, दालचिनीचा छोटा तुकडा, लसुण, कांदा परतून घ्या.
मग वाफवलेल्या भोपळ्याच्या फोडी किंवा प्युरी घालून छान मिसळा.
हे मिश्रण थंड झाले की मिक्सरमधून काढा .
आवडत असल्यास पातेल्यात थोडं बटर घेऊन त्यात मिक्सरमधून काढलेलं मिश्रण घाला. मग आवडीनुसार ऑरेगनो, थाईम व चवीनुसार मीठ घालून मस्त परतून घ्या. हे सूप जरा दाटसर चांगलं लागतं तर त्याअंदाजे पाणी घालून छान उकळी येऊ द्या. मग त्यात heavy whipping cream घालून २-३ मिनिटांनी गॅस बंद करा.
त्यावर थोडे अक्रोड, भोपळ्याच्या भाजलेल्या बिया, आवडत असल्यास जवसाच्या (flax seeds) बिया देखील घाला.
कुरकुरीतपणामुळे सुपाला वेगळीच, छान चव येते. गरम गरम सूप ‘Ready to drink’ खरं म्हणजे ‘eat’.
One pot meal करायचं असेल तर मस्त Panera style bread bowl आणून किंवा घरी बनवून हे सूप bread bowl मधे घाला आणि मस्त ताव मारा.

- बागेश्री नाईक







**Bhadipa**
Aai Me ani Gharcha Karya
March 3 2023




**Whitelilly & Nightrider**
April 7 2023




**Kaushiki Chakraborty**
Live in Concert
May 5 2023

Book your tickets at
**www.theparashare.com**

## रोप इवले


झाड वाढले
घाली घाव 'मुळावर'
ढासळे चिरा, अन् श्वास
पाराचा....

झाड वाळले
उद्ध्वस्त पार... अन् झाड
शुष्क कलेवर, अगाध महिमा
काळाचा......

झाड वाढले
घाली घाव 'मुळावर'
ढासळे चिरा, अन् श्वास
पाराचा....

झाड वाळले
उद्ध्वस्त पार... अन् झाड
शुष्क कलेवर, अगाध महिमा
काळाचा......

- संजय मेहेंदळे



(फोटो सौजन्य: मधु शिरगावकर)

With Best
Compliments from




Shri Thanedar & Family

thirak
Kathak Dance Studio

## Reshma Buch

Cell :734-262-0652 | **Email** :reshmabuch@yahoo.com
**Location :**
17714 Rolling Woods Circle, Northville, MI, 48168 ,Northville

## Description:
## Learn the Elegant and Royal Indian Classical Dance Form of KATHAK



Learn the Elegant and Royal Indian Classical Dance Form of KATHAK at THIRAK KATHAK DANCE

STUDIO by Reshma Buch, Kathak Visharada. Kathak Teaching inspired by Indian culture, tradition and discipline.

● Professional & Experienced
● Small Batches.
● Private 1-on-1 lessons also available.
● Ages 5 to 55+ years.

# With Best Compliments from

# Gangadhar and Pushpa Vaishampayan



# ‘काळ’ आला होता पण ‘वेळ’ आली नव्हती

काळ, वेळ कोणालाच सांगून येत नाही म्हणतात... आणि आपल्या आयुष्यात क्वचितच असा प्रसंग येतो की काळ आणि वेळ ह्यातल्या अत्यंत नाजूक रेषेवरून आपली कसरत होते आणि त्या प्रसंगांकडे मागे वळून बघितल्यावर, ‘काळ’ तिथेच थिजलेला दिसतो पण आपण कालचक्राबरोबर पुढे निघून गेलेलो असतो.
‘वेळे’ प्रमाणेच ‘स्थळ’ पण अजून एक अशी मिती आहे, जी जुळून यायला लागते. ह्याचा सुयोग/कुयोग असेल तरच ‘काळा’चा घाला बसतो. ‘स्थळ’ आणि ‘वेळ’ ह्यात थोडं उन्नीस-बीस झालं की मग माझ्यासारखा माणूस स्वत:चा थरारक अनुभव इतरांना, स्वत: सांगू शकतो.

माझी मोठी मुलगी, रेवा, आणि धाकटी, नोवा, ह्यांना Summer vacation मधे कुठेतरी फिरायला घेऊन जायची योजना आखत होतो. रेवाला adventurous rides आवडत असल्यामुळे शिकागोला Six Flags ला जायचं ठरलं. मग तिथेच college मधल्या मित्राकडे २-४ दिवस राहून धमाल करायचा बेत केला. शिकागो चा Morning Rush hour टाळायला सकाळी लवकर आवरून आम्ही चौघे डेट्रॉईटहून निघालो. गाणी, गप्पा गोष्टी करत करत शिकागोला कधी पोचलो कळलंच नाही. आजचा दिवस माझ्या मित्राकडे (सिद्धेश कुलकर्णी) आराम करून उद्या Six Flags ला जाण्यासाठी सगळेच excited होते.




(डावीकडून) सिद्धेश, ऋचा आणि मी, Raging Bull मधे घसा फोडून ओरडताना

दुसऱ्या दिवशी, सिद्धेश, त्याची बायको ऋचा, मुलगी अस्मि, आणि आम्ही चौघे, असे Six Flags ला adventurous rides वर झेंडे गाडायला पोचलो. DC Comics characters आणि Roller Coasters, Splash Rides बघून तर मुलांना काय करू काय नको असं झालं होतं. तिथल्या Max Force, X-Men, RagingBull, Superman rides बघून आम्हाला धडकी भरत होती पण पहिल्या एक-दोन rides सर्वात भन्नाट करायच्या असं ठरवलं. Raging Bull मधे २०० फुटावरून ७० मैल प्रतितास वेगाने खाली येताना ‘भान हरपणं’ काय असतं ह्याची प्रचिती आली. Max Force आणि Raging Bull अशा पहिल्याच rides केल्यावर आमचं Adrenaline पण roller coaster वर आहे असं वाटत होतं.

Final  Exam मधे पहिले दोन पेपर Algebra आणि Geometry चे झाल्यावर इतर Papers जसे क्षुल्लक वाटतात तसं पुढच्या rides ना वाटायला लागलं होतं.

तरीही प्रत्येक ride ला रांगेमध्ये थांबलेलं असताना, ride मधे बसताना एक काय अनेक विचार- Roller Coaster चा ‘एखादा’ Bolt पडला, तुटला तर?, Ride एकदम वर असताना नेमका आपलाच seatbeltच निघाला तर? Ride संपताना break नाही लागला तर?.. काही rides तर एवढ्या खतरनाक होत्या की एकदा माझ्या शेजारच्या गोऱ्याला चक्क मी रामरक्षा म्हणताना ऐकलं. ☺




असो,तर roller coaster सुरू झाला की सर्वाचा विसर पडत होता आणि सरते शेवटी रोमांचकारी अनुभवाची सरशी होत होती. Max Force Ride ला तर front seat मिळाली होती. तेंव्हा सारखं मनात येत होतं, एखाद्या Engine fail झालेल्या पायलटला, cockpit मधून विमान खाली येताना कसं दिसत असेल?.. नुसत्या कल्पनेनी पोटात गोळा येत होता.



माझ्या बायकोने, पूनमने मुलांच्या ridesची जबाबदारी घेतल्यामुळे, मी, सिद्धेश आणि ऋचा ह्या सगळ्या rides चा मनसोक्त आनंद घेत होतो.


दिवसभर rides करून दमून जायला झालं होतं. मेंदूपण म्हणत होता आता Adrenalineचा पुरवठा संपलाय, उदया भेटू! त्यामुळे आता एखाद्या restaurant मधे मस्त जेवण करून घरी जाऊ असं ठरवलं. वाटेत एक Mexican restaurant पसंतीस पडलं. रुचकर Mexican पदार्थांसोबत Sangria-Mojito आणि Six Flags मधे केलेली धमाल आठवत, जेवण एकदम फक्कड झालं. गप्पांच्या ओघात सिद्धेश, ऋचा आणि मला जरा जास्त झाली होती असं वाटत होतं, नव्हे झालीच होती.

माझी बायको, पूनम, Designated Driver असल्यामुळे, तिने steering हाती घेतलं. मी आणि सिद्धेश सर्वात मागे, मधल्या row मधे ३ लहान मुली आणि पुढे ऋचा आणि पूनम. गाडी भरली आणि मुलांची मस्ती चालू झाली म्हणून पूनम त्यांना झापत होती. गाडी निघायची 'वेळ' झाली आणि आम्ही घराच्या दिशेने कूच केली. थोड्या वेळात मुलं झोपून गेली. रात्रीचे १०-१०:१५ वाजले होते आणि रात्रीच्या नीरव शांततेत, Vernon Hillsच्या अंधाऱ्या freeway वरुन, ओसाड माळरानं, शेतं मागे टाकत गाडीनी आता चांगला 'मौसम' पकडला होता.

एवढ्यात... गाडीच्या मागे धडाम-धडधड असा मोठा आवाज आला आणि मुलं पण खडबडून जागी होऊन "काय झालं? काय झालं?" विचारायला लागली. मला वाटलं एखादा Semi Truck कुठल्या तरी गाडीला धडकलेला दिसतोय. काय घडलंय बघायला म्हणून गाडीच्या मागच्या काचेतून डोकावून बघितलं तर... एक Aircraft रस्त्यावरून घसरत घसरत आमच्या दिशेने येत होतं. मी जोरात ओरडलो 'विमान! विमान येतंय!'. आम्हाला जरा जास्त झालीये असंच पूनमला वाटत असल्यामुळे तिचा विश्वास बसत नव्हता. ह्या गडबडीमधे गाडीचा वेग मंदावला आणि सभोवताल पण मंदावून गेलंय असा भास झाला.

आरडाओरडा करून परत मागे बघितलं तर ते विमान कशाला तरी (बहुदा खांबाला) धडकलं होतं आणि गिरकी घेत, घसरत आमच्या गाडी कडे सरकत येत होतं. पूनम rear view mirror मधे त्या काळोख्या आंधारात मागचा अंदाज घेत होती आणि तिला ते पांढरं धूड सरपटताना दिसलं, तस्सं तिने आमची गाडी पुढे दामटली. गाडी पुढे जाता जाता, त्या गिरकी घेणाऱ्या विमानाचा उजवा पंख आमच्या गाडीच्या rear window च्या अगदी जवळून गेलेला मला दिसला. जेमतेम 4-6 इंचाचं अंतर राहिलं असेल. ‘काळ’ हा आपण चित्रांमध्ये नेहमी काळा बघतो पण इथे आम्ही पांढऱ्या विमानाच्या रूपात काळाला बघत होतो… आणि तो आमच्यापासून अगदी पावला दोनपावलावर थयथयाट करत होता आणि ‘वेळ’ साधायचा प्रयत्न करत होता.


शेवटी ते विमानाचं धूड road divider वर जाऊन धडकलं आणि अजून एक गिरकी घेऊन शांत झालं. एव्हाना आमची गाडी पण सुखरूप रस्त्याच्या कडेला घेतली होती आणि आम्ही विमानाच्या परिस्थितीचा अंदाज घेत होतो. सर्व शांत होतं पण आमची विमानाजवळ जायची काही धडगत होत नव्हती. लगेच 911 ला फोन केला. आमची तंतरली असल्यामुळे तिला आमचा ठाव-ठिकाणा सांगायला जरा कष्टच पडले.  त्या First Correspondent ने आम्हाला पुन्हापुन्हा विचारलं, “Repeat, It’s an airplane crash on the road??”, “Repeat..”  Emergency System ची कमाल आणि तिथे पुढच्या 2 मिनिटांमधे Ambulance, 2-3 Fire Trucks, Police cars घोंघावत पोहचल्या देखील. आम्ही सुटकेचा निश्वास टाकला आणि त्या विमानातील प्रवासी, वैमानिकांसाठी प्रार्थना करत आम्ही तिथून घराकडे निघालो.




धक्क्यातून अजून पूर्ण सावरलो नसल्यामुळे, पूनम ट्रॅफिक लाइट वर ऋचाला घाईघाईत विचारात होती, Red light ला थांबायचं असतं का वळलेलं चालतं? आणि ऋचा तिला म्हणत होती, “मला काहीच कळत नाहीये!, बहुतेक वळलेलं चालतं..” Cocktails आणि विमानाच्या Tailspin मुळे सगळ्यांचंच डोकं Spin झालं होतं. कसेबसे सावरत शेवटी आम्ही 11:30-12 ला घरी पोचलो. Roller Coaster चा Adrenaline rush, cocktails ची झिंग, सगळं काही क्षणामध्ये खाडकन उतरलं होतं. मला परत परत Max Force वरच्या ride मधलाच विचारआठवत होता, *‘Engine fail झालेल्या पायलटला, cockpit मधून विमान खाली येताना कसं दिसत असेल?’*




**Towing the aircraft off of Milwaukee Avenue (Craig/CapturedNews).**




घरी जाऊन Internet, TV वर अपघाताची काही माहिती मिळते आहे का ह्याचा शोध घेत होतो. काही वेळानी online बातमी आली, 'Engine failure मुळे एका private विमानाचं Milwaukee Av. वर Emergency Landing!'.

थोडा अजून शोध घेतल्यावर कळलं, ह्या Piper Cherokee विमानाच्या इंजिनात Michigan lake वर उडत असताना बिघाड झाला आणि pilot float करत करत Libertyville पर्यन्त आला होता. Emergency Landing च्या चक्करमधे आमच्या मागे land झाला होता.

आम्ही 'स्थळावर' आलो होतो, failed engine च्या रूपात 'काळ' पण आला होता मात्र आमची 'वेळ' आली नव्हती. आता timeline वर मागे वळून बघितलं की ते 'स्थळ', 'काळ' तिथेच थिजून गेलेला दिसतो आणि आम्ही मात्र पूनमने मुलींना ओरडण्यात जास्त वेळ न घालवल्यामुळे, मोक्याच्या क्षणी गाडी दौडवल्यामुळे आज तुम्हाला हा थरारक अनुभव स्वत: सांगू शकतोय.

- अभिजित जोगदेव

---




Namaste Flavours

# FOR ALL YOUR MORTGAGE NEEDS

VM

## VEMA MORTGAGE LLC

**SEBASTIAN GEORGE**

**Mortgage Broker**

**Contact me for a free rate quote**

**1-877-800-VEMA (8362)**

**saaby74@vemamortgage.com**



**We are open 24 X 7, 365 days a year**





kw CENTRAL

KELLERWILLIAMS.

35427 Dodge Park Rd. Sterling Heights, MI 48312

SELL IN A FLASH, CALL KASH!

## REALTOR®, KASHMIRA DESAI

**YOUR METRO DETROIT EXPERT**

**View What is *ACTIVE, PENDING & SOLD* in your Neighborhood go to www.kashmira.kwrealty.com**

**Cell (248) 974 6979 Office (248) 655-7955**

**realtor.kashmira@gmail.com**

SRS

Each Keller Williams Office is Independently Owned and Operated



V2SOFT
GLOBAL TECHNOLOGY SOLUTIONS


TECHNOLOGY | IT/ENGINEERING RESOURCES | OUTSOURCING
APP DEV | DIGITAL SERVICES | TESTING SERVICES INCLUDING AI TESTING
BLOCKCHAIN SOLUTIONS | CLOUD & MOBILE

**16 OFFICES**
**6 COUNTRIES**

MINORITY CERTIFIED BUSINESS
CERTIFIED IN CMMI LEVEL 3 AND ISO

WWW.V2SOFT.COM | INFO@V2SOFT.COM


PASHANKAR TOURS






























**FAMILY TOURS | EDUCATIONAL TOURS | CORPORATE TOURS | CRUISES**
**AIR TICKETING | HOTELS | CAB | VISA | PASSPORT ASSISTANCE**

---

**Associate Partner for Star Tours, Trafalgar, Cosmos and Many Cruise Companies**



# संडे स्पेशल कोंबडी - चिकन सागोती



नमस्कार मंडळी,
कोकणची खासियत म्हणजे मालवणी पद्धतीचे विविध माश्याचे/चिकन-मटणाचे पदार्थ. त्याचप्रमाणे शाकाहारी जेवणाबरोबरच विविध पक्वान्ने, नारळा-पोहयाचे आणि तांदळाचे अगणित प्रकार. लहानपणी उन्हाळ्याच्या सुट्टीत, आजोळी आमचा "मालवण दौरा" हा ठरलेलाच असायचा. त्यामुळे आज्जी, आई आणि नंतर सासूबाईंच्या काही खास अश्या पाककृती खायला, शिकायला मिळाल्या. त्यातलीच ही एक अत्यंत लोकप्रिय आणि चविष्ट रेसिपी. मालवणी पद्धतीचे पदार्थ खाऊन तुम्ही तृप्त व्हालच आणि इतरांना देखील तृप्त कराल यात शंका नाही. गरम गरम वाफाळलेल्या भाताबरोबर किंवा चपाती, भाकरीबरोबर पानात वाढल्यास सागोतीची न्यारीच लज्जत येते. नक्की करून पहा!

**साहित्य:**
- एक मध्यम आकराची कोंबडी (बारीक तुकडे करून-2LBS)
- ओला नारळ (२ कप)
- हळद - १ टीस्पून
- हिंग - १/४ टीस्पून
- तेल (एक वाटी)

**खडा गरम मसाला**
- बडीशेप (एक चमचा )
- खसखस ( १ टीस्पून )
- काळी मिरी (१०)
- धणे (२ टे. स्पून )
- सुक्या लाल मिरच्या (७-८)
- बेडगी मिरच्या (३-४)
- दालचिनी (१ लहान तुकडा)
- जायफळ - १/४ छोटा
- वेलची - १
- बडी इलायची १
- दगडफूल - १

**हिरवा मसाला:**
(हिरव्या मिरच्या (५/६)+आलं (१ इंच )+कोथिंबीर(एक कप )+लसूण (५-६ पाकळ्या))
- लाल तिखट (२ टे. स्पून - आवडीनुसार कमी जास्त करावे)
- मालवणी मसाला (२ टे. स्पून)
- मध्यम उभे चिरलेले कांदे (४)
- बारीक चिरलेले कांदे (२)
- मीठ (चवी पुरते )

**कृती:**
१. सर्वप्रथम कोंबडीचे तुकडे स्वच्छ धुवून, त्याला हिरवा मसाला म्हणजे आलं, लसूण, मिरची, कोथिंबीरीची पेस्ट, हळद,लाल तिखट, हिंग व चवीनुसार मीठ लावून चोळून (किमान २ तास) मॅरीनेट करून घ्यावे.
२. गरम तव्यावर एक चमचा तेल घालून त्यात वर नमूद केलेला खडा मसाला (बडीशेप, खसखस, काळी मिरी, धणे.... आणि नंतर त्यांतच सुक्या लाल मिरच्या घालून, सर्व जिन्नस एकत्र खमंग भाजून घ्यावे.
३ हा भाजलेला खडा गरम मसाला थंड झाल्यावर, अगदी कमीत कमी पाण्याचा वापर करून मिक्सर मधून बारीक वाटून घ्यावा. वाटण जास्त पातळ करू नये.
४ त्याच तव्यावर २ चमचे तेल घालून, त्यात उभा चिरलेला कांदा आणि ओला नारळ, गुलाबी रंगावर परतून छान घ्यावा.
५. हा भाजलेला कांदा आणि ओल्या नारळाचं मिश्रण थोडं थंड झाल्यावर, थोडे पाणी घालून मिक्सरमध्ये वाटून त्याचे जाडसर वाटण करून घ्यावे.
६. एका कढई /पातेल्यात पाव वाटी तेल घालून गॅसवर ठेवा. तेल तापल्यावर त्यात दोन तमालपत्रे व बारीक चिरलेला कांदा परतून घ्या.

७. त्यावर मॅरीनेट केलेलं चिकन आणि मालवणी मसाला घालून, पुन्हा एकदा व्यवस्थित परतून घ्या. मंद गॅसवर, पातेल्यावरील झाकणात थोडे पाणी घालून, चिकन अगदी सावकाश पूर्ण शिजू द्या.
८. त्यात खोबऱ्याचे वाटण आणि वाटलेल्या खडा मसाल्याचे मिश्रण घालून पुन्हा एकदा छान परतून घ्या.
९. चिकन व्यवस्थित शिजल्यावर, वरून बारीक चिरलेली कोथिंबीर घालून, कांदा आणि लिंबाच्या फोडींसह, गरम गरम वाफाळलेल्या भाताबरोबर किंवा चपाती, भाकरी बरोबर पानात वाढा.

- सरोज प्रशांत जावकर
Sjavkar1@yahoo.com
FB Page: Yummy In Tummy with Saroj

---






# FinesseAcademy

"Believing without limits."

*Online & In Person Classes That Help Your Child Succeed*

The present day life of a student is filled with challenges. Growing preteens and teens, who already experience enormous physical and hormonal changes within them, undergo several cognitive, social and emotional changes too when they enter middle school and high school.

Finesse Academy programs are designed to help students identify their strengths and fortify their weaknesses, while developing a true sense of confidence to achieve their goals



## CONFIDENCE BUILDING

Self-confident people have qualities that everyone admires.



## TIME MANAGEMENT

Efficient time management is the key to getting the most out of the day.



## SUCCESS

Preparing for your journey to success involves getting in the right mindset, and a commitment to stay with it.

**ONE-ONE COLLEGE PREP COUNSELING**

For more information:

**www.finesseacademy.com**

**Contact - Vidhi Ghosalkar @ 313.283.4343**

# पर्दा है ... पर्दा है ...

(एक फेब्रुवारी 'जागतिक हिजाब दिन' म्हणून पाळला जातो. त्या निमित्ताने हिजाब, नकाब, घुंगट, पर्दा असे शब्द घेऊन आलेली हिंदी सिनेमांतली काही गाणी आठवली. त्या गाण्यांची एक सफर ...)

एक फेब्रुवारीचा 'दिनविशेष' वाचल्या वाचल्या पहिल्या प्रथम तोंडातून गाणं आलं ते 'पर्दा है... पर्दा है... ' आणि मग सुरू झाली काळ्यापांढऱ्या पडद्यापासून ते नंतरच्या इष्टमनकलरच्या पडद्यांवर आलेली, कानांच्या पडद्यावर कायमस्वरुपी कोरल्या गेलेल्या सुरेल गाण्यांची सुरेख मैफिल...

काळ्यापांढऱ्या पडद्याच्या दिवसांपासून सुरु झालेली ही सूरयात्रा .... कुर्रेबाज राजकुमारसमोर उभा राहिलेला जितुभाई आणि त्याच्याबरोबर माला सिन्हा अशा 'एक फुल दो माली' टाईप ष्टोरीवर आलेल्या सिनेमातलं अतिशय अलवार गाणं:

अपने रुख पर निगाह करने दो

खूबसूरत गुनाह करने दो

रुख से पर्दा हटाओ जान-ए-हया

आज दिल को तबाह करने दो

रुख से ज़रा नकाब उठा दो, मेरे हुज़ूर

जलवा फिर एक बार दिखा दो, मेरे हुज़ूर

**(मेरे हुज़ूर)**

संत कबीरांच्या रचनेवर आधारित असलेलं

घूँघट के पट खोल रे, तोहे पिया मिलेंगे ।

घट घट मै तेरे साईं बसत है,


कटुक बचन मत बोल रे

**(जोगन)**

एक फुल दो माली सिनेमाच्या उल्लेखावरून आठवलेलं, संजय खान आणि साधना वर चित्रित केलेलं गाणं

ये पर्दा हटा दो, जरा मुखडा दिखा दो

**(एक फुल दो माली)**



Ugly duckling म्हणून सुरुवातीच्या दिवसांत हेटाळणी केली गेलेल्या नूतनचा, त्याच राज कपूरसोबत आलेला सिनेमा आणि त्यात आलेलं गाणं:


पर्दा उठे सलाम हो जाए

बात बन जाए काम हो जाए

ऐ हबीब मेरा तुझको सलाम

तुझको सलाम

**(दिल ही तो है)**




अर्थात राज कपूर आणि नूतन ही जोडी मला तरी फारशी कधीच आवडली नाही. जोडी आवडली ती देव आणि नूतन यांची. नुस्तं आठवून पहा, पेईंग गेस्ट आणि तेरे घर के सामने सिनेमे आणि त्यातली गाणी! विशेषतः 'तेरे घरके सामने इक घर बसाऊंगा' गाणं आणि त्या गाण्यात दोघांचा अभिनय!!

काळ्यापांढऱ्या पडद्याच्या दिवसांतलं... राज कपूर आणि नर्गिसच्या ऐन भरातल्या दिवसांतलं मनभावन के घर जाये गोरी,

घूँघट में शरमाये गोरी।

बंधी रहे ये प्यार की डोरी

हमें न भुलाना हमें न भुलाना

**(चोरी चोरी)**

अजून एक तितकंच अलवार गाणं

एक रात में दो दो चाँद खिले

एक घूंघट में एक बदली में

अपनी अपनी मंज़िल से मिले

एक घूंघट में एक बदली में

**(बरखा)**

या हिरोचं नाव नक्की आठवत नव्हतं; पण गाणं विसरणं शक्यच नव्हतं. शेवटी गाणं नुसतं ऐकायच्या ऐवजी 'बघितलं' आणि मग साहेबांचं नाव आठवलं. अनंत कुमार आणि नंदा या जोडीचं हे गाणं...

नंतर रंगीत सिनेमांचे दिवस सुरु झाले. सत्यकाम, बंदिनी सारख्या सिनेमांत शामळू बुजरा असणारा धर्मेंद्र आता कात टाकून 'ही-मॅन' होऊ लागला होता. त्या दिवसात आशा पारेख सोबत आलेल्या सिनेमातलं गाणं

पर्दे में रहने दो, पर्दा न उठाओ

पर्दा जो उठ गया तो भेद खुल जाएगा

अल्लाह मेरी तौबा अल्लाह मेरी तौबा

(शिकार)

‘अमिताभ’ नावाचं वादळ सिनेसृष्टीत घोंघावत असताना, लॉस्ट अँड फाऊंडचा फॉर्म्युला वापरून त्याला सर्वधर्मसमभावचा तडका दिलेला मल्टीष्टारकाष्ट सिनेमा. त्यात शिरडीचे साईबाबा होते आणि....

पर्दा है पर्दा

पर्दा है पर्दा

परदे के पीछे पर्दानशीं है

पर्दानशीं को बेपर्दा ना कर दूँ तो बेपर्दा...

**(अमर अकबर अँथनी)**

आवाजाची वेगळीच जातकुळी असलेली सलमा आगा आणि तिच्या सोबत दीपक पराशर आणि राज बब्बर यांच्या सिनेमातील या गाण्याने काही दिवस धूम केली होती...

चेहरा छुपा लिया है किसी ने हिजाब में

हाँ, चेहरा छुपा लिया है किसी ने हिजाब में

जी चाहता है आग लगा दूँ नक़ाब में

बिजली थी इक जो हम ने छुपा ली नक़ाब में

लग जाती वरना आग तुम्हारे शबाब में

**(निकाह)**

मिथुन आणि राज बब्बर एवढेच काय ते मोठे स्टार असलेला, लो बजेट असलेला, महाभारताच्या कथेशी मिळता-जुळता बेतलेला सिनेमा आणि त्यात आलेलं गाणं

का जानू मैं सजनिया

चमकेगी कब चंदनिया

घर में गरीब के

उठाईले घुंघटा चांद देख ले

**(हम पांच)**

अपवादात्मक गाण्यांमध्ये समावेश होऊ शकेल असं नव्वदीच्या दशकात आलेलं अमीर खान आणि जुही चावला वर चित्रित झालेलं,'हम है राही प्यार के' या सिनेमातील गाणं


घुंगट कि आड से दिलबर का ...

सत्तर ऐंशीच्या दशकानंतर बरंच काही बदललं. विशेषतः हिंदी सिनेमात!

दाखवायचं काय आणि झाकायचं काय, यात कुठलाच फरक उरला नाही.

कुठलाही आडपडदा न ठेवता पर्दानशीं ठेवायच्या गोष्टींचं खुलेआम प्रदर्शन पडद्यावर सुरू झालं.

असं असतांना घूँघट, नकाब, पर्दा यांची गाणी आता काळाच्या पडद्याआड गेली यात नवल ते काय?




- संजय मेहेंदळे


Great Cars.
Great Sales.
Great Service.
Two great locations with more brands ready to serve you!
SERRA
FORD ROCHESTER HILLS
Ford
serrafordrochesterhills.com
2890 S Rochester Rd., Rochester Hills, MI 48307
Direct: 248.852.0400
SERRA
BUICK GMC ROCHESTER HILLS
BUICK GMC
serrabuickgmcrochesterhills.com
855 S Rochester Rd., Rochester Hills, MI 48307
Direct: 248.651.5500



Century 21 Town & Country

Selling or buying a home is perhaps the single largest transaction most of us will make in our lifetime.

Allow me the privilege of helping you with this decision.



***Prasanna Mohanachandran***

***REALTOR***

Office : (248) 524-1600
Mobile: (248) 670-1943
Fax : (248) 524-1427
***pm.tcagents@gmail.com***

**Call now (248) 670-1943 (Cell)**

KARMA ENTERTAINMENT LLC

Mukund & Kanchan Wankhede
www.karma-entertainment.com
(313)-316-9132

Indian Fusion Show Production
Stage Lighting Consultation
Audio & Video
Stage Light Plan & Execution


मधुलता
पर्ल्स अॅण्ड ज्वेलर्स
मोतीवाले
Madhulata
Pearls & Jewelers
All types for fancy jewelry, one gram, diamond and pearls, various precious gift items, divine and pure items for all pooja
Please do visit and see new jewelry
CONTACT : PINGLE 248 229 5914
Wholesale and white label inquires email us : madhulatapearlstroy@gmail.com
Troy Michigan


जालना एज्युकेशन फाऊंडेशन
स्व. हेमिना दिनेश शाह यांच्या स्मृतिप्रित्यर्थ
आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या व होतकरू विद्यार्थ्यांसाठी
मोफत कोचिंग क्लासेस
इयत्ता : दहावी
पत्ता : जालना एज्युकेशन फाऊंडेशन, न्यु एम.बी. शोरूमच्या पाठीमागे, डि.एफ.सी. क्लासेसच्या खाली, पहिला मजला, बडी सडक, नविन जालना - 431 203.
संपर्क : जाधवसर मो. 9764279140, 8275271112, वाजपेयीसर मो. 9623628923, 7276012580, सुरेश लाहोटी सर मो. 9423457284, सुरेश कुलकर्णी (केसापूरकर) मो. 9423731480

# सुनंदा महिदाः एक प्रसन्न व्यक्तिमत्व

डेट्रॉईटचं मराठी मंडळ हे एक वेगळंच रसायन आहे. इथल्या कार्यक्रमांना येणारा प्रेक्षक वर्ग बहुआयामी आहे- वय वर्षे २ ते ९२! एवढ्या सर्व प्रेक्षकांच्यात एक हसरा चेहरा उठून दिसतो तो म्हणजे पुढच्या रांगेत बसलेल्या सुनंदाताई महिदा यांचा. आणि ओळख झाल्यावर कळतं की अनेक मराठी कार्यक्रमांना जातीने आणि कौतुकाने हजर असणारे त्यांचे पती, डॉ. विजयसिंह महिदा, अमराठी आहेत! कार्यक्रम संपला की मोकळ्या, खणखणीत आवाजात त्या गप्पा मारताना दिसतात - नव्हे, ऐकू येतात! त्या मोकळेपणामागचा प्रवास थोडा चाकोरीबाहेरचा आहे.



वडिलांच्या नोकरीमुळे त्या भारतात कलकत्त्यापासून हैद्राबादपर्यंत अनेक ठिकाणी राहिल्या. त्यामुळे विविध प्रांतातल्या आणि स्तरातल्या लोकांच्यात त्या रमताना दिसतात.
पण ही सहजता केवळ त्या फिरतीतून आलेली नाही.

त्यांचे वडील त्यांना म्हणायचे, तुझं आयुष्य फक्त रोज 'आज भाजी कुठली करू?' हा निर्णय घेण्यात जाता काम नये! आत्मनिर्भर राहण्याचा निश्चय तिथेच पक्का झाला आणि जवळजवळ ५५ वर्षांपूर्वी (हो, हो, त्यांचं वय आज ७५ आहे- भेटाल तेव्हा निरखून बघा,

अजिबात खरं वाटणार नाही!) त्या एका वेगळ्या वाटेकडे वळल्या. ज्या काळात स्त्रियांनी खूप शिकून जोरदार नोकरी करणे प्रचलित नव्हते त्या काळात त्यांनी 'हॉटेल मॅनेजमेंट' हा अभ्यासक्रम निवडला, पूर्ण केला आणि नंतर अनेक वर्षे त्या क्षेत्रात नोकरी केली. ताज,अँबॅसेडर सारख्या पंचतारांकित  हॉटेलांत त्यांची कारकीर्द फोफावली. कालांतराने त्या वायुदलातील उच्चपदस्थ अधिकाऱ्याशी विवाहबद्ध झाल्या. फौजी-पत्नीच्या भूमिकेत त्या केवळ पार्ट्या किंवा समारंभ आयोजन करून थांबल्या नाहीत तर १९७१च्या युद्धातील सैनिकांना आणि धारातीर्थी पडलेल्या सैनिकांच्या कुटुंबियांना सक्रिय मदत देखील करायच्या. खरं तर मुलं, संसार, फिरती यात त्यांचं आयुष्य सुखाने व्यतीत झालं असतं पण दुर्दैवाने वेगळी कथा लिहिली गेली. त्यांच्या पतीचे अचानक निधन झाले. सुनंदाताईंचा मार्ग पुन्हा बदलला.

त्यांचे भाऊ शिकागोत असतात. मुलांना घेऊन त्या शिकागोत आल्या आणि न खचता पुन्हा हॉटेल मॅनेजमेंट क्षेत्रात - नव्या देशात - दाखल झाल्या. नव्वदच्या दशकापर्यंत हायाट (Hyatt) आणि 'डबलट्री' या आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या हॉटेलात vice president पदावर होत्या.

पूर्वाश्रमीच्या सुनंदाताई जोशी आता सुनंदा महिदा झाल्या आहेत, नवा अध्याय डेट्रोईटमध्ये सुरु झाला आहे. त्यांच्या सहवासात आलेल्या अनेकांना त्यांच्या दिलदार स्वभावाचा लाभ झाला आहे. भारतीय देवळात ज्येष्ठ नागरिकांसाठी आखलेल्या अनेक उपक्रमांत त्या सहभागी होतात आणि मनापासून मदत करतात.

ताल अकॅडमी’ स्थापन होण्याआधी कैक वर्षे सुनंदाताई मनीषा डोंगरेच्या कार्यक्रमांना नेमाने जायच्या. सुरवातीच्या काळात एका कोजागिरीच्या कार्यक्रमाचं निवेदन मनीषा करत असता पुढच्या रांगेत त्या बसलेल्या आहेत हे लक्षात आलं. कार्यक्रमानंतर ओळख झाली. तिचा कथ्थकचा क्लास अजून घरापुरताच मर्यादित होता, आणि घरात जागा कमी पडायची. डॉ. महिदांची स्वतःची ऑफिसची जागा संध्याकाळी मोकळी असायची. सुनंदाताईंनी मनीषाच्या हाती किल्ली आणि क्लासला जागा दिली. त्यातूनच २ कुटुंबं जोडली गेली. डॉ. माहिदा स्वतः उच्चशिक्षित, भारत, जर्मनी आणि अमेरिका या तिन्ही देशांतील पदव्या प्राप्त केलेले धडाडीचे आणि अतिशय सज्जन गृहस्थ आहेत. त्यांची Civil Engineering Construction कंपनी होती. हॉटेलची नोकरी सोडल्यावर सुनंदाताई त्यांना हातभार लावत असत.




त्यांच्याशी बोलताना त्यांचा उत्साह, जगण्याकडे बघण्याचा सकारात्मक दृष्टिकोन सतत दिसून येतो. काही ना काही उद्योगात त्या कार्यरत असतातच.

आता Whatsappच्या कृपेने स्तोत्र, श्लोक पठणाचे गट चालू असतात. मदतीचा हात पुढे असतोच.

त्यांनी सतत हसत राहावं - 'आज भाजी काय करू?' हा निर्णय स्वेच्छेने घ्यावा -आणि मंडळाच्या कार्यक्रमांना जोडीने येत राहावं, त्यासाठी देवाने त्यांना दीर्घायुरारोग्य द्यावं हीच प्रार्थना!

शब्दांकन:
ज्योत्स्ना माईणकर दिवाडकर आणि मनीषा डोंगरे

---

SAT Math & English Test Prep Classes

The EDucation ENrichment Center

We have experienced teachers provide a structured approach to help students learn new math concepts, improve language arts abilities, and boost test scores

**ACT/SAT Test Prep**
- ACT Prep course
- SAT Prep course
- Test practice and reviews

**Math**
- K-5 Math
- Pre-Algebra
- Algebra I
- Algebra II
- Geometry
- Trigonometry
- Pre-Calculus
- Calculus

**English**
- K-12 Language Arts
- Grammar
- Reading Comprehension
- Writing
- Vocabulary




www.ed-en-center.com
248.528.1455
2328 Livernois Road, Troy, MI 48085

HONEST®

SKIP THE LINE,
ORDER ONLINE

SCAN ME

TROY MI

248.315.0234



desi delicacy
fulfilling desi cravings
Never miss the authentic taste & freshness of your favorite Indian Delicacies!
WHY US?
AUTHENTIC DELICACIES
FLAT RATE SHIPPING
4-6 DAYS DELIVERY
FRESHNESS GUARANTEED
BRANDS
चितळे
आठवलेज्
अग्रज फूड
ANUSHKA
Arka
कल्याण भेळ
www.desi-delicacy.com




MAHARASHTRA MANDAL OF DETROIT
Sankrant
Feb 12, Sunday
Women Entrepreneur - Shri Thanedar
Mar 11/12, Sat/Sun
Gudhipadwa
Mahesh Kale
Apr 01, Saturday
Badminton/Carrom
Apr 22/23, Sat/Sun
Kurr Natak May 06, Saturday
Aamne Saamne Natak
Jun 03, Saturday
All Hands & Yoga
Jun 24, Saturday
2023 EVENTS CALENDAR
Picnic
July 15, Saturday
Kids Movie Night
Aug 19, Saturday
Ganpati
Sept 23/24 or 30, Sat/Sun or Sat
Kojagiri
Oct 28, Saturday
Diwali Pahat
Nov 11/18, Sat/Sun
Diwali
Nov 18/19, Sat/Sun
Volunteer Appreciation Party
Dec 09/10, Sat/Sun


The Future of Coatings
Dhake Industries
GLOBAL SUPPLIER OF COATINGS FOR PLASTICS AND METALS
Dhake Industries offers a wide range of products for Interior and Exterior Automotive Applications as well as other Non-Automotive Applications. Our products are custom formulated to meet the most stringent requirements of any market
• Known in the Industry for Unsurpassed Technical Capabilities
• Leader in Metallic Paint Development for Auto Interiors
• Rapid Product Development with Custom Formulations to Meet Market and Customer Specific Requirements
Various Paint Technologies
• 2K Monocoat
• 2K Base/Clear
• 1K Waterbase
• 2K Waterbase
• One-Coat over TPO/PP
• Adhesion Promoters
• Laser-Etchable Coatings
• Soft-Touch Coatings
• Chrome-Look Coatings
• In-Mold Coatings
• Hydrographics Clearcoats
• Metallic Coating Finishes
• Non-Metallic Coating Finishes
• Much Much More...
Dhake Industries
Please contact us for more information ▸▸▸
Global Headquarters
15169 Northville Rd.
Plymouth, MI 48170
734-420-0101
www.dhakeindustries.com

“आपले मंडळ ”

# || Maharashtra Mandal of Detroit ||

तिळगूळ घ्या आणि गोड गोड बोला !



महाराष्ट्र मंडळ डेट्रॉईट

एकमेका सहाय्य करु, अवघे धरु सुपंथ

फेब्रुवरी २०२३